

**सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन करताना आळे महाविद्यालय विद्यार्थी.**

# जुन्नर महाविद्यालयात सायबर सुरक्षा कार्यशाळा

**आळेफाटा :** आळे (ता. जुन्नर) येथील बाळासाहेब जाधव महाविद्यालयातील संगणकशास्त्र विभाग व क्विक हिल फाउंडेशनच्या वतीने जुन्नर येथील श्री शिवछत्रपती महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा माहितीपर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. क्विक हिल फाउंडेशनच्या वतीने आळे महाविद्यालयाच्या संगणकशास्त्र विभागाची सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन करण्यासाठी निवड करण्यात आली आहे. जुन्नर महाविद्यालयात आयोजित या मार्गदर्शन कार्यशाळेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. एम. बी. वाघमारे, संगणकशास्त्र विभागप्रमुख मयुरी कुंभोजे यांच्या उपस्थितीत झाले. प्राचार्य डॉ. प्रवीण जाधव, विभागप्रमुख नूतन जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यशाळेत सायबर वॉरियर्स प्रतीक यादव, साक्षी नेहरकर, सोयब शेख यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन यावेळेस करण्यात आले. क्लब सेक्रेटरी मोहिनी जगताप हिने विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेची सामूहिक शपथ दिली. कार्यशाळा यशस्वी पार पाडण्यासाठी प्रा. सर्जेराव थोरात, रितेश खंडागळे, दीपांजली कदम यांनी परिश्रम घेतले.